# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १८/०३/२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १८/०३/२०१६ रोजी सभा सुचना क्र. २१ दि. १४/०३/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हरिश्चंद्र आंमगावकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | मा. सभापती |
| २. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| ३. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ६. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ७. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| ८. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| ११. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १२. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १३. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १४. | ॲड रवि व्यास | सदस्य |

गैरहजर सदस्य –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| २) | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |

मा. सभापतीः-

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १८/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २१, दि. १४/०३/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती. प्रकरण क्र. १६६, दि. २१/१२/२०१५, दि. ०८/०१/२०१६ व दि. २९/०१/२०१६ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

प्रशांत केळुसकर :-

ठराव क्र. १३० पान क्र. ५ वर वाहन भत्त्याबद्दल जो विषय आला आहे . २०,००० रू. जे आहेत ते वर्ग १-२ च्या अधिका-यासाठी शब्द होता आणि १०,००० रू. जे आहे इजिनियर व अधिकारी बाहेर फिरतीवर आहेत त्याच्यासाठी केलेले आहेत. दि. २१/१२/२०१५, दि. ०८/०१/२०१६ व दि. २९/०१/२०१६ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

दिनेश जैन :-

मा. सभापती महोदय आपण बजेटच्या मिटींगमध्ये मी एक सुचना मांडली होती ती त्याच्यामध्ये प्रिंट झाली नाही तर ती सुचना महासभेत आल्यावर प्रिंट करून घ्यावे.

मा. सभापती :-

ठीक आहे.

सुहास रकवी :-

मा. सभापती साहेब आमचे काय प्रिंट झाले आणि काय प्रिंट झाले नाही ते वाचायलाच वेळ मिळाला नाही.

मा. सभापती :-

आपण दुरूस्ती करून घेऊ.

सुहास रकवी :-

आम्ही लेखी देतो.

प्रकरण क्र. १६६ :-

दि. २१/१२/२०१५, दि. ०८/०१/२०१६ व दि. २९/०१/२०१६ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.१६१ :-

दि. २१/१२/२०१५, दि. ०८/०१/२०१६ व दि. २९/०१/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर          अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६७, महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढीव मागणीनुसार ठेकेदारांकडून संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन घेणेबाबत.

शरद पाटील :-

महानगरपालिकेच्या विविध विभागातील प्रशासकीय कामकाजासाठी ३४ संगणक चालक तथा लिपीक यांची सेवा ठेकेदारामार्फत उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. सदरचा ठेका मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट या कंत्राटदारास दि. ०२/१२/२०१५ रोजीच्या कार्यादेशान्वये दिलेला आहे. सदर कामाची मुदत ०३ वर्ष आहे. सदरच्या ठेक्यास मा. स्थायी समिती सभा दि. १४/१०/२०१५, ठराव क्र. ९५ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर कंत्राटदाराचा मंजूर दर रु. ११,६५०/- (सर्व करासहीत) प्रती संगणक चालक तथा लिपीक प्रतीमहा इतका आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती पाहता, नव्याने संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन देण्याची मागणी होत आहे. या अनुषंगे एकुण ३४ संगणक चालक तथा लिपीक नव्याने ठेकेदारांकडून उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. याप्रमाणे ठेकेदार मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांचेकडून नव्याने ३४ संगणक चालक उपलब्ध करुन घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे. त्याच प्रमाणे यापूढे विभागातील मागणीनुसार मा. आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर त्याबाबतची आवश्यकता निश्चित करुन ठेकेदाराकडून संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

मोहन जाधव :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

इंजिनियर आणि कनिष्ठ अभियंताची टेंडर काढली त्याची भरती केली नाही.

मा.उपायुक्त मुख्यालय :-

काढली होती परंतु त्यांनी जो एक्सपिरियन्स भरला होता....................

मा. सभापती :-

आवश्यकता असेल तिकडे भरती करून घ्या.

जयंतीलाल पाटील :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो हे ठेकेदार तेच आहेत का? ठेकेदार चेंज होत नाही का? टेंडर पाच वर्षाचे आहे का? पालिकेने ठराव केला आहे का की ठेकेदार तेच राहणार ठेकेदार पण चेंज करा.

विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-

सन्मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो दि. १४/१०/२०१५ स्थायी समिती ठराव क्र. ९५ ह्या नुसार जी मान्यता दिली आहे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट ह्यांना संगणक चालकाची मान्यता दिली आहे अजून ३४ संगणक चालकाची मागणी आलेली आहे.

जयंतीलाल पाटील :-

हा ठेका किती वर्षासाठी झालेला आहे.

विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-

तीन वर्षाचा आहे.

जयंतीलाल पाटील :-

आम्हाला ठेक्याची कॉपी मागवून द्या. किती वर्षासाठी ठेका देण्यात आलेला आहे ते समजले पाहिजे.

मा. सभापती :-

इजिनियर आणि वरिष्ठ अभियंता त्यांची भरती कधी करणार आहेत.

विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-

त्याची मागच्या वेळेला जाहिरात काढली होती. त्याच्यात ठेकेदारांनी अनुभव टाकले होते ते पूरवठादर केल्याचा दाखला होता तो इजिनियर पूरवठा केल्याचा नव्हता. तर मजूर लोकांचा पूरवठा होता. म्हणून आपण त्यांची निविदा ग्राह्य मानली नाही. आता फेर निविदा काढू त्याच्यामध्ये अशाप्रकारे ज्यांनी पूरवठा केला असेल त्यांची निविदा ग्राह्य मानू आणि पूढच्या स्टॅन्डिंगला देतो.

सुहास रकवी :-

मा. सभापतीसाहेब, त्याच्यामध्ये असे आहे वरती गणेश कृपा ट्रान्सपोर्ट कार्यादेश दिलेले आहेत आणि आता निविदा धारक गणेश ट्रान्सपोर्ट. गणेश कृपा की गणेश ट्रान्सपोर्ट जरा बघा.

विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-

प्रिंटींग मिस्टेक आहे. आपला जो पूर्वीचा ठेकेदार होता त्यांना तीन वर्षाची दिलेली आहे. २०१५ ला दिली आहे. म्हणजे २०१८ पर्यत आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

मर्लिन डिसा :-

मा. सभापतीसाहेब, हे कॉन्ट्रयाक्टर आहेत ते ट्रान्सपोर्ट बिझनेसमॅन आहेत.

मा. सभापती :-

ठेकेदाराच्या कंपनीचे नाव आहे.

मर्लिन डिसा :-

ट्रान्सपोर्ट कम्प्यूटर ऑपरेटर प्रोव्हाईड करतात आपल्याला टेक्नीकल लाईनवाले कॉन्ट्रॅक्टर भेटत नाही का? ट्रान्सपोर्ट वाले भेटतात.

मा. सभापती :-

कंपनी कोणत्याही नावाने असू शकते.

विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-

आपण जी निविदा मागवली त्याच्या अटीशर्ती मध्ये हे बसले म्हणून ह्याची निविदा मागच्या वेळी स्विकार केली. आता जी इजिनियर केली होती जे सप्लाय करणार लोक होते. त्याच्याकडे तो एक्सपिरिअन्स नव्हता म्हणून आपण त्यांची निविदा नाही केली.

जयंतीलाल पाटील :-

ती किती दिवसात होईल.

विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-

ती लगेच प्रोसिजर करतो.

प्रकरण क्र. १६७ :-

महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढीव मागणीनुसार ठेकेदारांकडून संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन घेणेबाबत.

ठराव क्र.१६२ :-

महानगरपालिकेच्या विविध विभागातील प्रशासकीय कामकाजासाठी ३४ संगणक चालक तथा लिपीक यांची सेवा ठेकेदारामार्फत उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. सदरचा ठेका मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट या कंत्राटदारास दि. ०२/१२/२०१५ रोजीच्या कार्यादेशान्वये दिलेला आहे. सदर कामाची मुदत ०३ वर्ष आहे. सदरच्या ठेक्यास मा. स्थायी समिती सभा दि. १४/१०/२०१५, ठराव क्र. ९५ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर कंत्राटदाराचा मंजूर दर रु. ११,६५०/- (सर्व करासहीत) प्रती संगणक चालक तथा लिपीक प्रतीमहा इतका आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती पाहता, नव्याने संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन देण्याची मागणी होत आहे. या अनुषंगे एकुण ३४ संगणक चालक तथा लिपीक नव्याने ठेकेदारांकडून उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. याप्रमाणे ठेकेदार मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांचेकडून नव्याने ३४ संगणक चालक उपलब्ध करुन घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे. त्याच प्रमाणे यापूढे विभागातील मागणीनुसार मा. आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर त्याबाबतची आवश्यकता निश्चित करुन ठेकेदाराकडून संगणक चालक तथा लिपीक उपलब्ध करुन घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- श्री. मोहन जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६८, महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध केलेल्या भ्रमणध्वनी सेवेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

सुहास रकवी :-

आमच्याकडे गोषवारा नाही.

मा. सभापती :-

आयडीयाचे जे आहे ते आपण एअरटेलमध्ये करतो. त्याचे रेंज नाही आणि फोन लागत नाही गैरसमज होतात अधिका-याचे फोन लागत नाहीत कोणाचा आवाज क्लियर नाही.

प्रशांत केळुसकर :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो नंबर तेच राहतील.

जयंतीलाल पाटील:-

मा. सभापती महोदय कार्ड चेंज करता काही हरकत नाही. पण ते कनवर्ट करायचे ना आपले जे स्टॅन्डिंग कमिटीचे जे १६ मेंबर आहेत त्यांना पण एक एक करा. मा. आयुक्तसाहेब स्टॅन्डिंगच्या सदस्यांचा विचार करा

शरद पाटील :-

मा. सभापती महोदय अगोदर कोणती कंपनी घ्यायची ते नक्की करा वोडाफोनची सर्व्हिस चांगली आहे.

मा. सभापती :-

एअरटेलची पूर्ण प्रोसिजर झालेली आहे. नंबर सेम राहणार आहे.

शरद पाटील :-

पुन्हा तुमच्या तक्रार नाही पाहिजेत की रेंज नाही हे नाही. आता ठरवा.

दिनेश जैन :-

दोन कंपनी ठेंवा ज्यांची रेंज चांगली आहे त्यांचे करा.

मा. सभापती :-

आता आपण एअरटेल करू रेंज मिळाली नाही तर वोडाफोन करू.

जयंतीलाल पाटील :-

१६ मेंबरचे पण होऊन जाईल का?

सुहास रकवी :-

ऊगाच प्रथा पाडू नका अधिका-यांना आवश्यकता आहे गेल्यावेळेला केळुसकर साहेबांना सांगितले होते की एअरटेलचे घ्या परंतू तेव्हा त्यांना वाटले आयडिया बरा होता. परंतू एअरटेल घेतल्यानंतर कमीत कमी तीन वर्ष बदलू नये असे काहीतरी करा.

प्रशांत केळुसकर :-

ह्याच्यापूर्वी पण एअरटेल होते तेव्हा पण त्याचे नेटवर्क पकडत नव्हते तेव्हा पण बंद झालेले.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत केळुसकर :-

आता एअरटेलवाल्यांनी सुधारणा केली आहे.

मोहन जाधव :-

उपरोक्त प्रकरणानुसार महानगरपालिकेचे पदाधिकारी /अधिकारी व कर्मचारी यांच्यात आपत्तीचे वेळी तसेच कार्यालयीन कामकाजात समन्वय साधून आपत्तीचे व तातडीचे वेळेस त्वरित संपर्क होण्यासाठी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १५८ दि. ०४/०३/२०१५ च्या मंजुरीने आयडीया कंपनीची सेवा सुरू करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत आयडीया कंपनीची सेवा सुरु असून त्यांचे सेवेबाबत तांत्रिक अडचण निर्माण होत असून बहुतांश वेळा संवाद चालू असताना आवाज खंडीत होणे, स्पष्ट आवाज ऐकू न येण, नेटवर्क नसणे अश्या तोंडी तक्रारी पदाधिकारी / अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत. एअरटेल कंपनीची नेटवर्क व भ्रमणध्वनी सेवा आयडीया कंपनीपेक्षा चांगली असल्याने एअरटेल कंपनीची सदर सेवा उपलब्ध करून द्यावी.

वरील सर्व बाबींचा विचार करता मे. आयडीया कंपनीची दुरध्वनी सेवा चांगली नसल्याने ती रद्द करून नविन सेवा पुरवठादार नियुक्त करण्याकरिता मे. एअरटेल कंपनीचे दर मागविले असता आयडीया कंपनी व एअरटेल कंपनीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Index No. | Name of The service | Monthly Rental | Call charges | | | | CUG | SMS | | | Free SMS Per | Free Minutes Call | Roaming Outgoing Calls | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | To Home | To others | STD | Land line | | Local | National | Inter National | | | Incoming Calls | Local Outgoing | STD Outgoing |

| | provider | | | | | | | | | | Month | | | Calls | Calls |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | IDEA | 99 | 0.33 | 0.30 | 0.50 | 0.50 | Free | 0.30 | 0.50 | 5.00 | 300 | 300 | 1.00 | 1.00 | 1.00 |
| 2 | Airtel | 199 | | 0.4 | | 0.5 | Unlimit Free | 0.5 | 5.00 | 5.00 | 300 Local+ Nation Free | 400 Local Free | 0.6 | 0.8 | |

उपरोक्त तुलनात्मक तक्ता पाहता मे. एअरटेल कंपनी ही Internet IGB then Unlimited Free देत आहे. तरी आयडीया कंपनीची सेवा रद्द करून एअरटेल कंपनीची सेवा आयडीया कंपनीपेक्षा चांगली असल्यामुळे मिरा भाईदर महानगरपालिकेतील पदाधिकारी, अधिकारी च कर्मचारी यांना तेच नंबर ठेवून एअरटेल कंपनीची भ्रमणध्वनी सेवा देण्यासाठी येणा-या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझी सुचना आहे की स्टॅन्डिंग समितीमध्ये १६ सदस्य आहेत त्याच्यासाठी पण तरतूद करण्यात यावी.

प्रकरण क्र. १६८ :-

महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध केलेल्या भ्रमणध्वनी सेवेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र.१६३ :-

उपरोक्त प्रकरणानुसार महानगरपालिकेचे पदाधिकारी /अधिकारी व कर्मचारी यांच्यात आपत्तीचे वेळी तसेच कार्यालयीन कामकाजात समन्वय साधून आपत्तीचे व तातडीचे वेळेस त्वरित संपर्क होण्यासाठी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १५८ दि. ०४/०३/२०१५ च्या मंजुरीने आयडीया कंपनीची सेवा सुरू करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत आयडीया कंपनीची सेवा सुरू असून त्यांचे सेवेबाबत तांत्रिक अडचण निर्माण होत असून बहुतांश वेळा संवाद चालू असताना आवाज खंडीत होणे, स्पष्ट आवाज ऐकू न येण, नेटवर्क नसणे अश्या तोंडी तक्रारी पदाधिकारी / अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत. एअरटेल कंपनीची नेटवर्क व भ्रमणध्वनी सेवा आयडीया कंपनीपेक्षा चांगली असल्याने एअरटेल कंपनीची सदर सेवा उपलब्ध करून द्यावी.

वरील सर्व बाबींचा विचार करता मे. आयडीया कंपनीची दुरध्वनी सेवा चांगली नसल्याने ती रद्द करून नविन सेवा पुरवठादार नियुक्त करण्याकरिता मे. एअरटेल कंपनीचे दर मागविले असता आयडीया कंपनी व एअरटेल कंपनीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Index No. | Name of The service provider | Monthly Rental | Call charges | | | | CUG | SMS | | | Free SMS Per Month | Free Minutes Call | Roaming Outgoing Calls | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | To Home | To others | STD | Land line | | Local | National | Inter National | | | Incoming Calls | Local Outgoing Calls | STD Outgoing Calls |
| 1 | IDEA | 99 | 0.33 | 0.30 | 0.50 | 0.50 | Free | 0.30 | 0.50 | 5.00 | 300 | 300 | 1.00 | 1.00 | 1.00 |
| 2 | Airtel | 199 | | 0.4 | | 0.5 | Unlimit Free | 0.5 | 5.00 | 5.00 | 300 Local+ Nation Free | 400 Local Free | 0.6 | 0.8 | |

उपरोक्त तुलनात्मक तक्ता पाहता मे. एअरटेल कंपनी ही Internet IGB then Unlimited Free देत आहे. तरी आयडीया कंपनीची सेवा रद्द करून एअरटेल कंपनीची सेवा आयडीया कंपनीपेक्षा चांगली असल्यामुळे मिरा भाईदर महानगरपालिकेतील पदाधिकारी, अधिकारी च कर्मचारी यांना तेच नंबर ठेवून एअरटेल कंपनीची भ्रमणध्वनी सेवा देण्यासाठी येणा-या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. मोहन जाधव  अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६९, भाईंदर (प.) जुने प्रभाग कार्यालय क्र.१ मधील तळ मजल्यावरील गाळे क्र. ४,५,६ व ७ भाड्याने देण्यास मान्यता मिळणेबाबत.

जयंतीलाल पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) जुने प्रभाग कार्यालय क्र. १ या इमारतीमधील तळमजल्यावर महानरगरपालिकेच्या मालकीचे गाळे क्र.४,५,६ व ७ आहेत. सदर जागेचे चालु बाजार भावाप्रमाणे म्हणजे शिघ्र गणकानुसार खालीलप्रमाणे भाडे ठरविण्यात आले होते.

| अ.क्र. | गाळा क्र. | क्षेत्रफळ | शिघ्र गणकानुसार भाडे रक्कम प्रति वर्ष | निविदाकाराने सादर केलेली भाडे रक्कम प्रति | निविदाकाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ४१,७८६/- | श्री. शकील कुरेशी |
| २ | ५ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ४२,७८६/- | श्री. अस्लम शब्बीर कुरेशी |
| ३ | ६ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ३८,७८६/- | श्री. तनवीर श. कुरेशी |
| ४ | ७ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ३९,७८६/- | श्री. अल्मास अ. कुरेशी |

वरीलप्रमाणे निविदाकाराने सादर केलेली भाडे रक्कम ही चालु बाजार भावापेक्षा (शिघ्र गणकानुसार) जादा रक्कम असल्याने सदर निविदाकारांना सदर जागा ५ वर्षे मुदतीसाठी करारनामा करुन भाड्याने देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

मोहन जाधव :-

माझे अनुमोदन आहे.

सुहास रकवी :-

ह्याच्यावर एक सुचना आहे भाईदर पश्चिमेला आपल्या प्रभागसमिती एक च्या खाली जेगाळे आहेत. तर काही लोकांच्या दोन्ही ठिकाणी गाळे आहेत. त्याच्यावर आपला काही धोरणात्मक निर्णय झाला तो गाळा व्यवसायाकरिता एखाद्या व्यक्तीला देतो. त्याच्यानंतर त्यांनी दूसरा घ्यायचा किंवा नाही हे धोरण निश्चित आहे का?

दिपक खांबित :-

एका व्यक्तिचे दोन गाळे पण नाव वेगळी असतील एकाला एकच दिले आहे.

सुहास रकवी :-

प्रत्यक्ष भेटून दाखवतो मग तसे असेल तर....................

जयंतीलाल पाटील :-

साहेब मी ठराव वाचला आहे. पण माझे असे म्हणणे आहे दोन वेगवेगळी असेल.................

सुहास रकवी :-

दोन गाळे एका व्यक्तिच्या नावे आहे ते दाखवतो एक व्यक्ति दोन गाळे घेऊ शकतो का?

दिपक खांबित :-

घेऊ शकतो तसे आपले काही नाही आहे.

सुहास रकवी :-

आपण ऑब्जेक्शन घेऊ तुमचा काय धोरणात्मक निर्णय झाला असेल, की त्याला आपण व्यवसायासाठी देतो.

जयंतीलाल पाटील :-

खांबित साहेब हे भाडे काय ठरले आहे.

दिपक खांबित :-

वर्षाचे भाडे आहे.

जयंतीलाल पाटील:-

महिण्याचे किती झाले.

दिपक खांबित :-

४५०० वैगेरे आहे .

जयंतीलाल पाटील :-

टपरी लावतात त्याचे ४००० भाडे लावतात. मग गाळ्याचे तुम्ही ४००० काय हिशोबाने लावले आहे.

दिपक खांबित :-

एवढी वर्ष १००० रू. होते.

जयंतीलाल पाटील :-

मार्केट रेट काढा.

दिपक खांबित :-

मार्केट रेट प्रमाणेच आहे.

सुहास रकवी :-

रेडी रेक्नरप्रमाणे आहे ते गाळे छोटे आहेत.

जयंतीलाल पाटील :-

किती बाय कितीचे आहेत.

सुहास रकवी :-

आठ बाय नऊचे आहेत.

जयंतीलाल पाटील :-

साईज टाका ना साहेब मला वाटते रोडवर टपरी लावली तरी ३००० ते ४००० भाडे मिळते आपल्याकडे चिकन आणि मटणासाठी गाळे भेटत नाही १०००० ते १५००० भाडे घेतात.

दिपक खांबित :-

तिकडे मार्केट आहेत तिकडून मच्छीमार्केटमधून रोजचे १० रू. घ्यायचे आहेत ते पण किती वर्षापासून भरत नाही. तेथे लिलावाचे टेंडर काढतो.आतमध्ये जे मच्छीवाले बसतात त्याचे दिवसाचे १० रू. महिण्याचे ३०० रू. कूठल्याचे मार्केटच पैसे भरत नाहीत ती आपण कारवाई सूरू करतो.

जयंतीलाल पाटील :-

कुरेशी सगळे एकाच घरातले आहेत का?

दिपक खांबित :-

सगळे वेगवेगळे आहेत. टेंडर भरले ते सगळे आले आहेत.

जयंतीलाल पाटील :-

भाऊ तेच आहेत नाव वेगळी आहेत त्यांना कायमचा ठेका देऊन टाका.

मा. सभापती :-

टेंडर ज्यांनी भरले त्याची निविदा काढली.

जयंतीलाल पाटील :-

ह्याची पेपरात जाहिरात दिली आहे.

सुहास रकवी:-

साहेब हे टेंडर काढून प्रोसिजर करून झाले आहे .

मा. सभापती :-

ज्यांनी भरले त्यांनाच लागलेले आहेत. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १६९ :-

भाईदर (प.) जुने प्रभाग कार्यालय क्र.१ मधील तळ मजल्यावरील गाळे क्र. ४,५,६ व ७ भाड्याने देण्यास मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. १६४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) जुने प्रभाग कार्यालय क्र. १ या इमारतीमधील तळमजल्यावर महानरगरपालिकेच्या मालकीचे गाळे क्र.४,५,६ व ७ आहेत. सदर जागेचे चालु बाजार भावाप्रमाणे म्हणजे शिघ्र गणकानुसार खालीलप्रमाणे भाडे ठरविण्यात आले होते.

| अ.क्र. | गाळा क्र. | क्षेत्रफळ | शिघ्र गणकानुसार भाडे रक्कम प्रति वर्ष | निविदाकाराने सादर केलेली भाडे रक्कम प्रति | निविदाकाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ४१,७८६/- | श्री. शकील कुरेशी |
| २ | ५ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ४२,७८६/- | श्री. अस्लम शब्बीर कुरेशी |
| ३ | ६ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ३८,७८६/- | श्री. तनवीर श. कुरेशी |
| ४ | ७ | -- | रु. ३५,७८१/- | रु. ३९,७८६/- | श्री. अल्मास अ. कुरेशी |

वरीलप्रमाणे निविदाकाराने सादर केलेली भाडे रक्कम ही चालु बाजार भावापेक्षा (शिघ्र गणकानुसार) जादा रक्कम असल्याने सदर निविदाकारांना सदर जागा ५ वर्षे मुदतीसाठी करारनामा करुन भाड्याने देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. जयंतीलाल पाटील अनुमोदक :- श्री. मोहन जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७०, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ६ मधील जरीमरी तलाव, सुकाळ (साईदत्त) तलाव येथील विविध विकास कामे करण्याबाबत.

दिनेश जैन :-

उपरोक्त विषयानूसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ६ मधील जरीमरी तलाव, सुकाळ (साईदत्त) तलाव येथे मा. खासदार, श्री. राजन विचारे यांच्या खासदार निधीमार्फत आर्टिकल गॅलेरी व साईदत्त तलावामध्ये तलावाचे सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. जरीमरी तलावाची संरक्षण भिंत ढासळल्याने सदर भिंत आर.सी.सी. स्वरुपाची करण्यात आलेली आहे. नव्याने बांधलेल्या आर.सी.सी. भिंतीवर ग्रील बसविणे आवश्यक आहे.

साईदत्त तलावामध्ये खासदार निधी मार्फत जॉगीग ट्रक व इतर सुशोभिकरण्याचे काम सुरु आहे. तथापी सदर ठिकाणी जुनी दगड बांधकामाची संरक्षण भिंत काही ठिकाणी ढासळली असून सदर भिंत जॉगीग ट्रक अगोदर आर.सी.सी. स्वरूपात बांधणे गरजेचे आहे. सदर तलावाच्या आतील संरक्षण भिंतीच्या ग्रील जुन्या असून तुटलेल्या अवस्थेत आहेत. संरक्षणाच्या दृष्टीने सदर ग्रील नव्याने बसविणेची आवश्यक आहे. तसेच जरीमरी तलावामधील जुनी दगडी संरक्षण भींत नादुरूस्त असल्याने सदर ठिकाणी नवीन आर.सी.सी. संरक्षण भींत बांधणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत सदर तलावांची कामे सुरू असल्याने आताच सदर कामे करणे योग्य होईल. सदर कामाचे खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा सुकाळ (साईदत्त) तलाव येथील आर.सी.सी. भिंत बांधणे. | रु.३८,५२,८००/- |
| २ | मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा सुकाळ (साईदत्त) तलाव येथिल आतिल संरक्षण भिंतीला नवीन M.S. ग्रील लावणे. | रु.२८,३५,५००/- |
| ३ | जरीमरी तलाव येथील उर्वरीत आर.सी.सी. संरक्षण भींत बांधणे. | रु.४९,३७,१००/- |

वरील कामाच्या खर्चाची तरतूद सन २०१५-१६ आर्थिक वर्षाच्या “सार्व. तळे विहीरी सुशोभिकरण करणे” या लेखाशिर्षकात रु.१,५८,४५,०६९/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १७० :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ६ मधील जरीमरी तलाव, सुकाळ (साईदत्त) तलाव येथील विविध विकास कामे करण्याबाबत.

ठराव क्र. :-

उपरोक्त विषयानूसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ६ मधील जरीमरी तलाव, सुकाळ (साईदत्त) तलाव येथे मा. खासदार, श्री. राजन विचारे यांच्या खासदार निधीमार्फत आर्टिकल गॅलेरी व साईदत्त तलावामध्ये तलावाचे सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. जरीमरी तलावाची संरक्षण भिंत ढासळल्याने सदर भिंत आर.सी.सी. स्वरुपाची करण्यात आलेली आहे. नव्याने बांधलेल्या आर.सी.सी. भिंतीवर ग्रील बसविणे आवश्यक आहे.

साईदत्त तलावामध्ये खासदार निधी मार्फत जॉगीग ट्रक व इतर सुशोभिकरण्याचे काम सुरु आहे. तथापी सदर ठिकाणी जुनी दगड बांधकामाची संरक्षण भिंत काही ठिकाणी ढासळली असून सदर भिंत जॉगीग ट्रक अगोदर आर.सी.सी. स्वरूपात बांधणे गरजेचे आहे. सदर तलावाच्या आतील संरक्षण भिंतीच्या ग्रील जुन्या असून तुटलेल्या अवस्थेत आहेत. संरक्षणाच्या दृष्टीने सदर ग्रील नव्याने बसविणेची आवश्यक आहे. तसेच जरीमरी तलावामधील जुनी दगडी संरक्षण भींत नादुरूस्त असल्याने सदर ठिकाणी नवीन आर.सी.सी. संरक्षण भींत बांधणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत सदर तलावांची कामे सुरू असल्याने आताच सदर कामे करणे योग्य होईल. सदर कामाचे खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा सुकाळ (साईदत्त) तलाव येथील आर.सी.सी. भिंत बांधणे. | रु.३८,५२,८००/- |
| २ | मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा सुकाळ (साईदत्त) तलाव येथिल आतिल संरक्षण भिंतीला नवीन M.S. ग्रील लावणे. | रु.२८,३५,५००/- |
| ३ | जरीमरी तलाव येथील उर्वरीत आर.सी.सी. संरक्षण भींत बांधणे. | रु.४९,३७,१००/- |

वरील कामाच्या खर्चाची तरतूद सन २०१५-१६ आर्थिक वर्षाच्या “सार्व. तळे विहीरी सुशोभिकरण करणे” या लेखाशिर्षकात रु.१,५८,४५,०६९/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन                    अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७१, भाईदर (पूर्व) केबीन रोडवरील नर्मदा कुंज ते प्रिन्स प्लाझा इमारती पर्यंत रस्त्याचे पुर्न:पृष्ठीकरण करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मुन्ना सिंह :-

भाईंदर (पूर्व) प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ (जुनी प्रभाग समिती २) मधील भाईंदर (पूर्व) केबिन रोडवरील नर्मदा कुंज ते प्रिन्स प्लाझा इमारती पर्यंत रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी पावसाल्यामध्ये पाणी जमा होत आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे पुर्नपृष्ठीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी कामाची पहाणी करून खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईदर (पूर्व) केबिन रोडवरील नर्मदा कुंज ते प्रिन्स प्लाझा इमारती पर्यंत रस्त्याचे पुर्न:पृष्ठीकरण करणे | रु.३६,२२,२५०/- |

वरील कामांच्या खर्चाची तरतुद सन २०१५-१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात "सार्व. रस्ते देखभाल, दुरूस्ती/ पुर्नपृष्ठीकरण"या लेखाशिर्षकात करण्यात आली असून सध्या रु.२१,४८,७९३/-इतकी तरतुद उपलब्ध आहे.सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

शर्मिला बगाजी :-

मा. सभापतीसाहेब इथे खर्च दाखवला आहे ३६ लाख २२ हजार २५० आपल्याकडे शिल्लक आहेत २१ लाख ४८ हजार ७९३ एवढा डिफरंन्स

मा. सभापती :-

१४ ते १५ लाखाचा आहे. पुढच्या वर्षात घ्या. ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. १७१ :-

भाईदर (पूर्व) केबीन रोडवरील नर्मदा कुंज ते प्रिन्स प्लाझा इमारती पर्यंत रस्त्याचे पुर्न:पृष्ठीकरण करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्र.१६६ :-

भाईंदर (पूर्व) प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ (जुनी प्रभाग समिती २) मधील भाईंदर (पूर्व) केबिन रोडवरील नर्मदा कुंज ते प्रिन्स प्लाझा इमारती पर्यंत रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी पावसाल्यामध्ये पाणी जमा होत आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे पुर्नपृष्ठीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी कामाची पहाणी करून खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईदर (पूर्व) केबिन रोडवरील नर्मदा कुंज ते प्रिन्स प्लाझा इमारती पर्यंत रस्त्याचे पुर्न:पृष्ठीकरण करणे | रु.३६,२२,२५०/- |

वरील कामांच्या खर्चाची तरतुद सन २०१५-१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात "सार्व. रस्ते देखभाल, दुरूस्ती/ पुर्नपृष्ठीकरण"या लेखाशिर्षकात करण्यात आली असून सध्या रु.२१,४८,७९३/-इतकी तरतुद उपलब्ध आहे.सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. मुन्नासिंग              अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७२, जे.सी.बी., पोकलन मशीन व डंपर पुरवठा करणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

दिनेश जैन :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासीत करणे कामी जेसीबी, पोकलन मशीन, डंपर व इतर यंत्रसामुग्री पुरवठा करणे बाबत अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाने यापुर्वी दि.२१/०४/२०१२ रोजी निविदा मागविल्या होत्या. मात्र, एकही निविदा प्राप्त न झाल्याने पुन्हा एकवार दि.०५/०५/२०१२ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी फेर निविदा सुचनेसही प्रतिसाद मिळाला नव्हता. परिणामी, अतिक्रमण विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विरोधी मोहीमेवेळी मशीन वेळीच प्राप्त न झाल्याने विभागाची फार मोठी गैरसोय होत असे.

मा.स्थायी समितीच्या दि.०९/०३/२०१२ रोजीच्या सभेने आरोग्य विभागाकरीता दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी वरील यंत्रसामुग्री पुरवठा करणे बाबत दर मंजुर करण्यात आले होते. सदर मंजुर दराने मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना आरोग्य विभागामार्फत कार्यादेश देण्यात आला आहे. अतिक्रमण विभागाने मागविलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने आरोग्य विभागाने कार्यादेश दिलेल्या दराने अतिक्रमण विभागास जेसीबी, पोकलन मशीन व डंपर पुरवठा करणेबाबत तत्कालीन मा.आयुक्त सो यांनी दि.०८/११/२०१२ रोजी मंजुरी दिलेली आहे. आरोग्य विभागाने वरील दर ५ वर्षाकरीता मंजुर केले असून करारनामा देखील त्याच कालावधीकरीता केलेला आहे. उपरोक्त मंजुर दराने वरील यंत्रसामुग्री पुरवठा करणे बाबत अतिक्रमण विभागानेही मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना पत्र क्र.मनपा/अवि/२४९/२०१२-१३ दि.३०/११/२०१२ अन्वये कार्यादेश दिलेला आहे. करारनाम्याच्या व कार्यादेशाच्या अनुषंगाने पुरवठादाराने चालु आर्थिक वर्षात देखील वरील यंत्र सामुग्रीचा पुरवठा केलेला आहे. मात्र, सदर कामी होणाऱ्या खर्चाकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ करीता वरील यंत्रसामुग्रीच्या पुरवठया बाबत अंदाजे रु.५०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात "जेसीबी/गॅस कटर्स/ट्रक निगा भाडयाने घेणे" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.६०.०० लक्ष इतक्या रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीतुन रु. ३.०० लक्ष इतकी रक्कम खर्च झाली असून रु.५७.०० लक्ष इतकी रक्कम शिल्लक आहे.

सबब, वरील यंत्रसामुग्री पुरवठा करणेकामी होणाऱ्या रु.४९.०० लक्ष इतक्या खर्चास अर्थिक व प्रशासकीय मंजुरी व त्याकामी वेळोवेळी येणारी देयके अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत केळुसकर :-

उर्वरित जी रक्कम राहील त्याच्यासाठी पुन्हा...............

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १७२ :-

जे.सी.बी., पोकलन मशीन व डंपर पुरवठा करणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. १६७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासीत करणे कामी जेसीबी, पोकलन मशीन, डंपर व इतर यंत्रसामुग्री पुरवठा करणे बाबत अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाने यापुर्वी दि.२१/०४/२०१२ रोजी निविदा मागविल्या होत्या. मात्र, एकही निविदा प्राप्त न झाल्याने पुन्हा एकवार दि.०५/०५/२०१२ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी फेर निविदा सुचनेसही प्रतिसाद मिळाला नव्हता. परिणामी, अतिक्रमण विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विरोधी मोहीमेवेळी मशीन वेळीच प्राप्त न झाल्याने विभागाची फार मोठी गैरसोय होत असे.

मा.स्थायी समितीच्या दि.०९/०३/२०१२ रोजीच्या सभेने आरोग्य विभागाकरीता दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी वरील यंत्रसामुग्री पुरवठा करणे बाबत दर मंजुर करण्यात आले होते. सदर मंजुर दराने मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना आरोग्य विभागामार्फत कार्यादेश देण्यात आला आहे. अतिक्रमण विभागाने मागविलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने आरोग्य विभागाने कार्यादेश दिलेल्या दराने अतिक्रमण विभागास जेसीबी, पोकलन मशीन व डंपर पुरवठा करणेबाबत तत्कालीन मा.आयुक्त सो यांनी दि.०८/११/२०१२ रोजी मंजुरी दिलेली आहे. आरोग्य विभागाने वरील दर ५ वर्षाकरीता मंजुर केले असून करारनामा देखील त्याच कालावधीकरीता केलेला आहे. उपरोक्त मंजुर दराने वरील यंत्रसामुग्री पुरवठा करणे बाबत अतिक्रमण विभागानेही मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना पत्र क्र.मनपा/अवि/२४९/२०१२-१३ दि.३०/११/२०१२ अन्वये कार्यादेश दिलेला आहे. करारनाम्याच्या व कार्यादेशाच्या अनुषंगाने पुरवठादाराने चालु आर्थिक वर्षात देखील वरील यंत्र सामुग्रीचा पुरवठा केलेला आहे. मात्र, सदर कामी होणाऱ्या खर्चाकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ करीता वरील यंत्रसामुग्रीच्या पुरवठया बाबत अंदाजे रु.५०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात ''जेसीबी/गॅस कटर्स/ट्रक निगा भाडयाने घेणे'' या लेखाशिर्षाअंतर्गत रु.६०.०० लक्ष इतक्या रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीतुन रु. ३.०० लक्ष इतकी रक्कम खर्च झाली असून रु.५७.०० लक्ष इतकी रक्कम शिल्लक आहे.

सबब, वरील यंत्रसामुग्री पुरवठा करणेकामी होणाऱ्या रु.४९.०० लक्ष इतक्या खर्चास अर्थिक व प्रशासकीय मंजुरी व त्याकामी वेळोवेळी येणारी देयके अदा करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७३, विविध कामांच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

प्रशांत केळुसकर :-

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात खालील कामांची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदाचे दर प्राप्त झाले आहेत.

१)मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील ओस्तवाल ॲव्हेन्यु ते शुभ चिंतन हाईट्स पर्यतच्या रस्त्यावर नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू. ३५,०२,२००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | १०.११% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% जास्त दराने |
| २) मे. एस. डी. बुटाला | १२.००% जास्त दराने |
| ३) मे. गणेश डेव्हलपर्स | १५.३०% जास्त दराने |

२) पाणी पुरवठा विभागाअंतर्गतSemi automatic water meter testing laboratory उभारणी करणे.
(अंदाजित रक्कम रू. ४९,६९,४००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | ९.००% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% जास्त दराने |
| २) मे. श्री महावीर इलेक्ट्रोमॅकेनिकल प्रा.लि. | ११.१०% जास्त दराने |
| ३) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरींग वर्क्स | ११.५०% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.०१ या कामाकरीता मे. विंध्या ट्रेडर्स व अ.क्र.०२ या कामाकरिता मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

जयंतीलाल पाटील :-

पाणी पूरवठयाचे आपण बजेट मिटींगला मंजूरी दिली ना.

प्रशांत केळुसकर :-

हे वेगळे आहे.

शरद पाटील :-

मा. सभापतीमहोदय त्यांनी अनुमोदन द्यायच्या अगोदर का नाही विचारले.

जयंतीलाल पाटील :-

अनुमोदन द्यायचे बरोबर आहे पण मला हा पण खुलासा करणे जरूरीचे आहे. आपण स्टॅन्डिंग समिती १६५ करोडचे पास केले आहे.

शरद पाटील :-

साहेब त्यांची मंजूरी झाली आणि ते कसे काय प्रश्न विचारतात.

प्रशांत केळुसकर :-

ह्या निविदा आहेत तरतूद होती.

प्रकरण क्र. १७३ :-

विविध कामांच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

ठराव क्र.१६८ :-

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात खालील कामांची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदाचे दर प्राप्त झाले आहेत.

१)मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील ओस्तवाल ॲव्हेन्यु ते शुभ चिंतन हाईट्स पर्यतच्या रस्त्यावर नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू. ३५,०२,२००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | १०.११% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% जास्त दराने |
| २) मे. एस. डी. बुटाला | १२.००% जास्त दराने |
| ३) मे. गणेश डेव्हलपर्स | १५.३०% जास्त दराने |

२) पाणी पुरवठा विभागाअंतर्गतSemi automatic water meter testing laboratory उभारणी करणे.
(अंदाजित रक्कम रू. ४९,६९,४००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | ९.००% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% जास्त दराने |
| २) मे. श्री महावीर इलेक्ट्रोमॅकेनिकल प्रा.लि. | ११.१०% जास्त दराने |
| ३) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरींग वर्क्स | ११.५०% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.०१ या कामाकरीता मे. विंध्या ट्रेडर्स व अ.क्र.०२ या कामाकरिता मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७४, Jet Spraying Machine खरेदी करुन चार चाकी वाहनावर फॅब्रिकेशन कामाच्या प्राप्त निविदांना मंजूरी मिळणेबाबत.

दिनेश जैन :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व. आरोग्य विभागामार्फत शहरात डास नियंत्रण करणे कामी Jet Spraying Machine खरेदी करून चार चाकी वाहनावर फॅब्रिकेशन करणे कामी पात्र निविदाकाराचे वाटाघाटी केल्यानंतर प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदेचे नाव | निविदाकाराचे नाव | वाटाघाटी नंतर प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | Jet Spraying Machine खरेदी करून चार चाकी वाहनावर फॅब्रिकेशन करणे | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | रु. ६,११,०००/- प्रती नग |

वरीलप्रमाणे तीन नगJet Spraying Machine खरेदी करुन तीन वाहनावर फॅब्रिकेशन करणे कामी वाटाघाटी नंतरसादर केलेले दर स्विकारणेस हि सभा मंजुरी देत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रशांत केळुसकर :-

सर्व सन्मा. सदस्यांना बॅग देण्यात यावी निविदा मागवायची गरज नाही. डायरेक्ट कंपनीकडून घ्या. मिरा भाईदरच्या सर्व सन्मा. सदस्यांना बजेटच्या तरतूदीमधील सर्वाना बॅग देण्यात याव्यात. मिरा भाईंदर महानगरपालिका सन्मा. सदस्यांना अंदाजपत्रकासोबत दरवर्षी बॅग उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याच धर्तीवर यावर्षी देखील सन्मा. पालिका सदस्यांना बॅग उपलब्ध करुन देण्यात याव्यात. उकत बॅग ह्या थेट उत्पादकाकडून खरेदी करण्यास ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

स्टिवन मेन्डोन्सा:-

माझे अनुमोदन आहे.

मुन्ना सिंह :-

मा. सभापतीसाहेब १५ दिन में बॅग मिलेगा उसकी जबाबदारी आपकी है अभी तक लोगो को लेटरहेड नही मिला है।

मा. सभापती :-

आजका आज प्रोसिजर हो जायेगा।

प्रशांत केळुसकर :-

आपले सभागृहनेते मुन्ना सिंह त्यांनी भांडारला २५ तारखेला पत्र दिले अजून त्यांना लेटरहेड मिळाले नाही.

दिनेश जैन :-

उद्या महासभा आहे.

मुन्ना सिंह :-

उद्या जर त्यांना सभागृहनेता म्हणून कोणाला पत्रव्यव्हार करायचा असेल तर त्यांनी कसा करावा.

मा. सभापती :-

भांडार विभागाने तात्काळ करावाई करायची आहे.

स्टिवन मेन्डोन्सा :-

मा. सभापती साहेब माझी सुध्दा स्टॅन्डिंग समितीची दूसरी टर्म आहे पण मला पण लेटर हेड मिळाले नाही हे काय बोलायला लागते का?

दिपक कुरळेकर :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो सदस्यांची आणि पदाधिका-यांची मागणी असते त्याचप्रमाणे पूरवठा होतो.

मुन्ना सिंह :-

मैं सदस्य हूँ।

दिपक कुरळेकर :-

कॉन्टेटी आम्हाला लक्षात येत नाही.

मुन्ना सिंह :-

कौनसा कॉन्टेटी.

प्रशांत केळुसकर :-

५००-५०० देतो  सर्व सन्मा. सदस्य आहेत त्यांना लेटर हेड द्या.

दिपक कुरळेकर :-

देतो लगेच देतो.

मा. सभापती :-

जेवढे सन्मा सदस्य आहेत त्यांना लेटरहेड व्हिजीटींग कार्ड ५००-५०० देण्यात यावे. आणि ठेकेदारांनी टाईमावर दिले नाही तर त्याचा ठेका रद्द करण्यात यावा.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १७६ के प्रस्ताव –

महापालिका सन्मा. सदस्यांना बॅग उपलब्ध करणेबाबत.

ठराव क्र.१७१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका सन्मा. सदस्यांना अंदाजपत्रकासोबत दरवर्षी बॅग उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याच धर्तीवर यावर्षी देखील सन्मा. पालिका सदस्यांना बॅग उपलब्ध करुन देण्यात याव्यात. उकत बॅग ह्या थेट उत्पादकाकडून खरेदी करण्यास ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. स्टीवन मेन्डोंसा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

जयंतीलाल पाटील :-

मा. सभापती साहेब, माझा गंभीर विषय आहे. मागच्या स्टँडिगमध्ये मी धरणाचा विषय मांडला होता हा विषय गंभीर नाही का? आहे की नाही.

प्रशांत केळुसकर :-

ह्या संदर्भात आपण ठरवले होते आपल्या सगळयांना जायचे आहे.

मा. सभापती :-

आपल्याला जायचे होते पण बजेटमुळे टाईम मिळाला नाही.

जयंतीलाल पाटील :-

पाण्यासाठी आज लोक रस्त्यावर उरतली आहेत, प्रत्येक दिवशी आंदोलन चालू आहे. हा विषय आपल्यासाठी महत्त्वाचा नाही का? आज चेन्याच्या नदीचे पाणी समुद्राला वाहून जाते तर हा साठा केला तर मिरा भाईंदरला छोटेसे धरण होऊन जाईल मग हा विषय तुम्ही का घेत नाही हा ज्वलंत विषय आहे.

मुन्ना सिंह :-

मा. सपाभती महोदय, मिरा भाईंदर में पानी सिस्टमसे नही छूट रहा है, तब तक किधर साईट व्हिजीट मत करो नही तो पब्लिक मारेगी।

सुहास रकवी :-

गलत मेसेज मत दो।

मुन्ना सिंह :-

गलत मेसेज नही है।

(सभागृहात गोंधळ)

जयंतीलाल पाटील :-

मा. आयुक्त साहेब, त्या प्रभागातले नगरसेवक स्टँडिगचे आहे त ते स्वतः बोलतात चेन्याला चला. माझ्याकडून होईल ते को-ऑपरेट करणार पण तुम्ही का पास करून घेत नाही. इच्छा आहे की नाही.

शिवाजी बारकूंड :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो. आपली साईट व्हिजीट ठरली होती बजेटमुळे राहिली. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात साईट व्हिजीट करू सर्व अधिकारी/पदाधिकाऱ्याना वाटते की मिरा भाईंदरचा डॅम व्हावा परंतु तिथे खरी वस्तूस्थिती अशी आहे की तिकडे सगळे फॉरेस्ट आहे ह्याच्या ३-४ वर्षापूर्वी मी स्वतः गेलो होतो. काकाणी साहेब, लाखे साहेब होते. फॉरेस्टवाले आपल्याला एक इंचही जागा देणार नाहीत. आम्ही त्यांना सांगितले की आम्ही धरण बांधू संजय गांधी नॅशनल पार्कमधले प्राणी आहेत त्यांना देखील पिण्यासाठी पाणी होईल आणि उरलेले मिरा भाईंदरसाठी घेऊ त्यावेळेस त्यांनी प्रतिसाद दिला नाही ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही म्हणत असाल तर परत एकदा प्रयत्न करू सगळयानी मिळून जाऊया परंतु हा प्रयोग हयाच्या अगोदर झालेला आहे. आम्ही स्वतः साईट व्हिजीट केलेली आहे. चेण्याच्या आतमध्ये केलेली महाजन वाडीच्या मागच्या बाजूला केलेली आहे. फॉरेस्टवाल्या अधिकाऱ्याना पण बोलावले होते. फॉरेस्टची जागा शक्यतो मिळत नाही. साधी पाईप लाईन टाकायला परवानगी मिळत नाही तर डॅम बांधण्यासाठी किती तरी एकरमध्ये जागा लागेल एवढी जागा मिळायची शक्यता कमी तरी माननीय स्थायी समिती बोलते तर आपण एप्रिलमध्ये साईट व्हिजीट करू. संबंधीत अधिकाऱ्या बरोबर मिटींग करू आणि आपण प्रयत्न करु. बजेट झाल्यावर एप्रिलच्या पहिल्या आठवडयात आपण जाऊ. परत एकदा जाऊ.

रविंद्र माळी :-

साहेब ती जागा वेलकराची आहे.

शिवाजी बारकूंड :-

